**पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण**

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक १६.०१.२०१७<br>१८.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक १६.०१.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे सिल्लोडग्रामिण:—** गुरन । २०/१७ कलम ३५३ ३२३ ५०४ ५०६ ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे केशव यशवंतराव झोंड वय ५२ वर्ष व्यवसाय नौकरी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत रहिमाबाद ता. सिल्लोड यांनी फिर्याद दिली की फिर्यादी हा ग्रामपंचायत कार्यालय रहीमाबाद येथे काम करीत असताना यातील आरोपी नामे १) योगेश आनंदा शिरसाठ २) समाधान किसन शिरसाठ दोन्ही रा. रहिमाबाद ता. सिल्लोड हे ग्रामपंचायत कार्यालयात आले व आ.क्रं. ०१ म्हणाला की तुम्ही आमचे घरासमोरील खड्डा का बुजवला नाही त्यावर फिर्यादी समजावुन सांगत असताना आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस शिविगाळ करून मारहाण केली व तुम्ही खड्डा बुजवला नाही तर तुम्हाला पाहुन घेईन अशी जिवे मारण्याची धमकी देवुन वरील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीचे टेबल वरील कागदपत्राची फेकाफेक करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/३३६ बोराडे पोस्टे सिल्लोडग्रामिण हे करीत आहे.

**०२) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन । १९/१७ कलम ३७९ भादवि सह कलम २१(१)(२)(३)(४)(५) गौणखनिज कायदा सह कलम ११३/९४ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे अनिल सुखदेव शिंदे वय ३५ वर्ष व्यवसाय नौकरी मंडळअधिकारी चिकलठाणा ता.जि. औरंगाबाद यांनी फिर्याद

दिली की यातील आरोपी नामे कैलास बळीराम राठोड रा. जोगेश्वरी वाडी ता. अंबड जि. जालना याने विनापरवाना बेकायदेशीररित्या त्याचे ताब्यातील वाहन क्रं. एमएच २० डीई ७११० मध्ये अंदाजे ४ ब्रासवाळु चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने चोरून घेवुन जात असताना मिळुन आला त्याचे ताब्यातुन ४ ब्रास वाळु २००००/—रू. किं. व एक हायवा ट्रक किं. १० लाख रूपये किं. असा एकुण १० लाख २० हजार रूपयाचा माल मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/८६६ शेख पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे शिवुर :—** आ.मृ. नंबर ०५/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार सुधाकर देवजी पारधे वय ५४ वर्ष व्यवसाय शेती रा. टुनकी ता. वैजापुर यांनी खबर दिली की यातील मयत नामे गोरख कचरू रंधे वय ५० वर्ष रा. टुनकी ता. वैजापुर यास आज दिनांक १६.०१. २०१७ रोजी ११.००वा. दरम्यान त्याचे राहते घरी छातीत दुखु लागल्याने त्यास उपचार कामी प्राथमिक आरोग्य केंद्र शिवुर येथे आणले असता त्यास १२.००वा. तपासुन मृत घोषीत केले वगैरे खबरी आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/१८२ सरोदे पोस्टे शिवुर हे करीत आहे.

**०२) पोस्टे करमाडः—** आ.मृ. नंबर ०३/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार सुनिल प्रकाश सपकाळ वय २७ वर्ष व्यवसाय नौकरी रा. जळगाव ता. भोकरदन जि. जालना यांनी खबर दिली की यातील मयत नामे शोभाबाई प्रल्हाद सुर्यवंशी वय ४० वर्ष रा. पांढरी पिंपळगाव ता.जि. औरंगाबाद हि तीचे राहते घरी दिनांक १३.०१.२०१७ रोजी ०७.३०वा. चुलीत रॉकेल टाकत असताना ८५ टक्के भाजल्याने तीचे वर बेंबरे हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार चालु असताना आज मरण पावली आहे वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/६५१ चाबुस्कवार पोस्टे करमाड हे करीत आहे.

**०३) पोस्टे देवगाव रंगारीः—** आ.मृ. नंबर ०३/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार एस.के. चव्हाण पोह/१९९१ पोस्टे सातारा औरंगाबाद शहर यांनी खबर दिली की यातील मयत नामे चंद्रकलाबाई पंडीत जाधव वय २५ वर्ष रा. केसापुर ता. कन्नड हि दिनांक २६.१२.२०१६ रोजी राहते घरी केसापुर येथे स्वतःचे अंगावर रॉकेल टाकुन घेतल्याने तीस उपचार कामी बेंबडे हॉस्पीटल येथे दाखल केले असताना औषधोपचार चालु असताना ती दिनांक ०५.०१.२०१७ रोजी

०२.१५वा. मरण पावली वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्रीमती आडे सपोनि पोस्टे देवगाव रंगारी हे करीत आहे.

**वाहतुक शाख व पोस्टे अंतर्गत कार्यवाही :—**

**दिनांक १६**.०१.२०१७ रोजी औरंगाबाद ग्रामीण जिल्हा वाहतुक शाखा व पोस्टे अंतर्गत केलेलया अवैध प्रावासी वाहतुक — ०७ केसेस ७०००/रू दंड, ईतर —१२७ केसेस १२७००/—दंड, अशा एकुण — १३५ केसेस १९७००/रू दंड वसुल करण्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री कुलकर्णी पोउपनि नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**